N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** अमरावती शहर **P.S.(ठाणे):** गाडगे नगर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0602 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 09/07/2024 07:50

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) | |
|---|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 | |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A | |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार

**Time Period (कालावधी):** पहर 6

**Date From (दिनांक पासून):** 08/07/2024

**Date To ( दिनांक पर्यंत):** 08/07/2024

**Time From (वेळेपासून):** 17:57 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 18:15 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 09/07/2024 **Time (वेळ):** 07:50 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 012

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 09/07/2024 07:50 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 5 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** विभागीय कषी सहसंचालक अम ,अमकार्यालय

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्री. शंकर शामराव शाहु

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1986

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | शेलु बुद्रुक, वाशीम,गुरू माऊली नगर, शेलु बाजार रोड,गाडगे नगर,अमरावती शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | शेलु बुद्रुक, वाशीम,गुरू माऊली नगर, शेलु बाजार रोड,गाडगे नगर,अमरावती शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-8668343975

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | बाबु श्री दिलीप काशीनाथराव वंजारे | | | 1. विजयपथ नगर सिपना कलेज जवळ अम,गाडगे नगर,अमरावती शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):
अप. क्र. 602/2024 कलम 7 ,7(A)भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम-1988
फिर्यादी नामे -श्री. शंकर शामराव शाहु, वय-38 वर्ष, धंदा- सरकारी नोकरी, पद - कृषी सहायक, नेमणुक- शेलु बुद्रुक, ता. जि. वाशीम. रा. गुरु माऊली नगर, शेलु बाजार रोड, वाशीम. मो.नं. 8668343975.
आरोपी नामे - बाबु श्री दिलीप काशीनाथराव वंजारे वय-46वर्ष पद-वरीष्ठ लिपीक विभागीय कृषी सहसंचालक अम विभाग अम.रा. विजयपथ नगर सिपना कॉलेज जवळ अम.
घ.ता.वेळ -दिनांक 08/07/2024 चे 17.57वा.18.15 दरम्यान
घटनास्थळ - विभागीय कृषी सहसंचालक अम विभाग अम.कार्यालय
हकीकत - मी वर नमुद पत्यावर माझे कुटूंबासह राहतो. माझी पत्नी सौ. चंद्रकला धोंडीबा तोडवाड - शाहु ही सुध्दा कृशी सहायक या पदावर मु. कोडाळा झाबारे ता. जि. वाषीम येथे कार्यरत आहे.

मी दि.08/07/2024 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो अमरावती येथे येवून माझी तक्रार दिली की, माझ्या व माझी पत्नी सौ. चंद्रकला धोंडीबा तोडवाड-शाहु वर मा. जिल्हा कृषी अधिक्षक, वाशीम यांनी आमचे विरुध्द आलेल्या तक्रार अर्जावरून अदांजे 9 महीनेपुर्वी शिस्तभंग कारवाई करण्याचा प्रस्ताव विभागीय कृशी सह संचालक, अमरावती विभाग, अमरावती यांचेकडे पाठवला होता. त्याअनुषंगाने श्री. किषन मुळे, विभागीय कृशी सहसंचालक, अमरावती विभाग, अमरावती यांनी सुनावणी साठी दि. 05/07/2024 रोजी विभागीय कृषी सह संचालक, अमरावती विभाग, अमरावती येथे हजर राहणेकरीता मला व माझी पत्नीला लेखी नोटीस दिली होती. त्याअनुशंगाने मी व माझी पत्नी दि. 05/07/2024 रोजी विभागीय कृषी सह संचालक, अमरावती येथे हजर राहीलो होतो. त्यावेळी श्री. किशन मुळे साहेब मला बोलले की, "तु खूप शहाणा झाला आहे काय? थांब तुला आणि तुझ्या पत्नीला दोघांना निलंबीत करतो आणि लांब कुठेतरी मुख्यालय देतो.. मग तुला समजेल." असे बोलले. त्यावेळी मी साहेबांना विनंती केली की, "सर माझी व माझे पत्नीची काहीच चूक नाही आम्ही आमची डयुटी प्रामाणीक पणे केली आहे." त्यावर मुळे साहेब म्हणाले की, "ठीक आहे...तुझे तर निलंबन करणारच आहे.. आणि तुला वाटते की, मी तुला मदत करावी तर तुला पैसे खर्च करावे लागतील, तरच तुझ्या पत्नीला निलंबित करत नाही व तुला निलंबन काळात तुझे पसंतीचे मुख्यालय देतो." नाहीतर तुझ्या पत्नीला पण निलंबित करतो" असे बोलले त्यावर मी घाबरून मुळे साहेबांना पैसे देतो असे बोललो. त्यावर मला मुळे साहेबांनी पैशाबाबत बोलण्यासाठी प्रशासकीय अधिकारी श्री उमेश गजभीये यांना भेटण्याबाबत सांगितले त्यानंतर मी प्रशासकीय अधिकारी श्री. उमेश गजभीये यांना भेटलो गजभीये साहेबांनी पैश्याबाबत बोलणी करण्यासाठी कार्यालयातील बाबु श्री दिलीप वंजारे यांना बोलवुन घेतले व "बाबु वंजारे साहेबाशी पैशाचे बोलुन घ्या" असे सांगितले. त्यावेळी श्री वंजारे साहेब मला कार्यालयाबाहेर घेवुन गेले आणि मला "जर तुमच्या पत्नीचे निलंबन थांबवायचे असेल आणि तुम्हाला पण निलंबन काळात तुमच्या जवळचे मुख्यालय पाहीजे असेल तर तुम्हाला 1,00,000/- रू दयावे लागतील. त्यामध्ये मुळे साहेबाचे 40,000/-रू, गजभीये साहेबांचे 40,000/- रू व माझे 20,000/-रू असा हिशोब आहे. तरच तुम्हाला सुनावणी मध्ये मदत होईल" असे मला बोलले. त्यावर मी वंजारे साहेबाना "विचार करून सांगतो "असे बोललो. त्यावर वंजारे साहेबांनी मला "ठीक आहे" विचार कर आणि मला फोन करून सांगा आणि फोन करताना व्हॉटस अँप व्हाईस कॉल करा " असे बोलले. त्यानंतर मी व माझी पत्नी तेथुन निघुन आलो. त्यानंतर षनिवारी दि. 06/07/2024 रोजी मला संध्याकाळी वंजारे साहेबांचा मला रेग्युलर कॉल आला व मला " व्हॉटस अँप व्हाईस व्हाईस कॉल करा असे बोलले" त्यावर मी त्यांना "हो ठीक आहे". असे बोलुन त्याना माझे व्हॉटस अँप मोबाईल नंबर वरून त्यांचे व्हॉटस अँप मोबाईल नंबरवर व्हाईस कॉल केला. त्यावेळी वंजारे साहेबांनी मला विचारले कि, "काय विचार केला ? काही ठरवले का?" असे विचारले. त्यावर मी त्यांना बोललो "ठीक आहे साहेब, मी तुम्हाला अमरावती येथे भेटायला येतो "असे बोललो,

त्यावर वंजारी साहेबांनी "मला ठिक आहे ,येताना 50,000/- रू घेवुन येजा बाकी परत बघु" असे बोलले. त्यावर मी त्यांना "ठीक आहे "असे बोललो. त्यानंतर मी दिनांक 07/07/2024 रोजी अमरावती येथे येवुन श्री.वंजारे साहेब यांची भेट घेतली व नाईलाजास्तव घाबरून त्यांना माझेजवळील 15,000/- रू. नगदी रोख रक्कम दिली. परंतू आता मला मला श्री. मुळे साहेब, श्री. गजभीये साहेब व श्री. वंजारे साहेब यांना लाच रक्कम देण्याची इच्छा नसल्याने त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी अषा आषयाची तोंडी तक्रार सांगुन स्वहस्ताक्षरामध्ये लेखी तक्रार दिली. त्यानंतर पोनि मांजरे साहेब यांनी शासकिय तंत्रनिकेतन अमरावती येथुन पंच श्री. जिवन दाभाडे, पद - भांडारपाल व श्री. संजय मेश्राम,पद - प्रयोगषाळा सहायक असे दोन सरकारी पंच कारवाई करीता बोलविले. त्यानंतर पो.नि.मांजरे यांनी पंचाचा परीचय देवुन मला थोडक्यात हकीकत सांगण्यास सांगितली वरून मी पंचाना माझी हकीकत सांगितली त्यानंतर त्यांना पो.नि.मांजरे यांनी माझी लेखी तक्रार पंचाना वाचण्यास दिली. मी सांगितलेली तोंडी तक्रार व दिलेले लेखी तक्रार पंचानी वाचुन पंच क्र.1 श्री. दाभाडे यांनी षेरा लिहुन दोन्ही पंचांनी तक्रारीवर सहया केल्या व समक्ष म्हणुन पोनि मांजरे साहेब यांनी सुध्दा सही केली आहे. त्यानंतर मी दिलेल्या तक्रारीच्या अनुशंगाने पो.नि.मांजरे साहेब यांनी सांगीतले की, मला श्री. मुळे साहेब, श्री. गजभीये साहेब व श्री. वंजारे साहेब हे खरच लाच रक्कम मागणी करीत आहे किंवा नाही याबाबत पडताळणी कारवाई करावी लागेल तसेच श्री.वंजारे यांनी मला आज दिनांक 08/07/2024 रोजी कार्यालयामध्ये बोलाविले असल्याने सर्वानुमते पडताळणी कारवाई करण्याचे ठरविले. याबाबत सविस्तर पडताळणी पुर्व पंचनामा पो.नि.मांजरे साहेब यांनी केला.त्यानंतर पो.नि.मांजरे यांनी सापळा पथकातील सर्व अधिकारी व कर्मचारी तसेच दोन्ही पंचाना व मला पडताळणी कारवाई बाबत सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर अंदाजे 13.57 वाजेच्या सुमारास माझेजवळ व्हाईस रेकॉर्डर चालू करुन मला व पंच क्र.1 श्री. दाभाडे असे विभागीय कृशी सहसंचालक, अमरावती विभाग, अमरावती कार्यालय येथे श्री.वंजारे यांना भेटण्याकरीता रवाना केले. त्याठिकाणी पोहचल्यानंतर मी श्री.वंजारे यांना फोन करून कार्यालयाचे बाहेर आल्याचे सांगितले असता श्री.वंजारे हे विभागीय कृषी सह संचालक, अमरावती विभाग, अमरावती कार्यालयाचे बाहेर येवुन मला भेटले. श्री.वंजारे यांनी माझे कामासंबधाने चर्चा करून मला माझ्या पत्नीचे निलंबन थांबविण्याकरीता व मला निलंबन कालावधीमध्ये जवळचे मुख्यालय देण्याकरीता 1,00,000/- रुपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली. तेव्हा मी श्री.वंजारे यांचेसह कार्यालयात जावुन श्री.गजभीये, व श्री.मुळे यांना भेटलो असता त्यांनी मला कायदेशीर काम होईल असे म्हटले. त्यानंतर मी व पंच क्र.1 दाभाडे असे लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय येथे परत येवुन घडलेली हकीकत सर्वासमक्ष पंच क्र.2 यांना सांगितली. पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक श्री.दिलीप वंजारे यांनी माझ्या पत्नीचे निलंबन थांबविण्याकरीता व मला निलंबन कालावधीमध्ये जवळचे मुख्यालय देण्याकरीता 1,00,000/- रुपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम स्विकारण्याचे निश्पन्न झाले त्यावरून लोकसेवक श्री.वंजारे यांचे विरूध्द लागलीच सापळा कार्यवाही आयोजित करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.त्यानंतर पो.नि.मांजरे यांनी मला लाचेची रक्कम हजर करण्यास सांगितले असता माझ्याकडे 1,00,000/- रूपये लाच रक्कम उपलब्ध नसल्यामुळे मी माझ्याजवळील 25,000/- रुपये ज्यामध्ये 500 रुपये दराच्या 50 नोटा हजर केल्या. त्या नोटांचे क्रमांक पो.नि.मांजरे यांनी पंच क्र.1 श्री.दाभाडे यांना वाचण्यास सांगुन पंच क्र.2 श्री. मेश्राम यांना को-या कागदावर लिहिण्यास लावले व त्यावर पंचांनी व मांजरे साहेब यांनी सहया केल्या. त्यानंतर मांजरे साहेब यांच्या सुचनेवरून स्टाफ वैभव जायले यांनी मी हजर केलेल्या नोटाला अँन्थ्रासीन पावडर लावुन प्रात्यक्षिक करून तसेच मला व पंचाना अल्ट्राव्हायलेट लॅम्प बाबत माहीती दिली. त्यानंतर हजर केलेल्या लाच रक्कमेला अँथ्रासिन पावडर लावुन लाच रक्कम माझे जिन्स पॅन्टचे डाव्या बाजुच्या खिषामध्ये ठेवुन दिली. व सापळापुर्व कारवाई पुर्ण झाल्यानंतर स्टाफ वैभव जायले यांनी व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन देवून मला व पंच क्र.1 श्री. दाभाडे असे आलोसे श्री.दिलीप वंजारे यांची भेट घेण्याकरीता विभागीय कृषी सहसंचालक, अमरावती विभाग, अमरावती कार्यालय येथे रवाना केले, त्यानंतर आमच्या पाठोपाठ आपण सापळा पथकातील इतर कर्मचारी व अधिकारी हे खाजगी वाहनाने विभागीय कृशी सहसंचालक, अमरावती विभाग, अमरावती कार्यालय जवळ येवुन कार्यालयाच्या आजुबाजुला आडोसा घेवुन थांबले. त्यानंतर मी व पंच क्रमांक 1 श्री.दाभाडे असे विभागीय कृशी सहसंचालक, अमरावती विभाग, अमरावती कार्यालयात जावुन श्री.दिलीप वंजारे यांना भेटलो असता, श्री.दिलीप वंजारे यांनी 25,000/- लाच रक्कम माझे कडुन स्विकारले नंतर मी कार्यालयाचे बाहेर येवुन लागलीच लाच रक्कम स्विकारण्याचा नियोजित इषारा केला. त्यावेळी तात्काळ त्याठिकाणी मांजरे साहेब, पाटील साहेब, पंच क्र.2 श्री. मेश्राम तसेच सापळा पथकातील सर्व स्टाफ आले व त्यांनी श्री.वंजारे यांना ताब्यात घेतले. त्यावेळी मांजरे साहेब यांनी श्री.वंजारे यांना पंचाचा व सापळा पथकातील अधिकारी/अमंलदार यांचा परिचय करून दिला. तेव्हा स्टाफ वैभव जायले यांनी माझ्या जवळील व्हाईस रेकॉर्डर बंद केले. त्यानंतर मांजरे साहेब यांनी श्री.वंजारे यांना त्यांचे नाव, पद, व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव श्री.दिलीप काषीनाथराव वंजारे, वय - 46 वर्श, पद - वरीश्ठ

लिपीक, विभागीय कृशी सहसंचालक, अमरावती विभाग, अमरावती, रा. विजयपथ नगर, सिपना कॉलेजजवळ, अमरावती असे सांगितले. व पुढील कारवाई करीता सर्वजण लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय अमरावती येथे आल्यानंतर श्री.वंजारे यांनी माझ्या कडुन स्विकारलेली लाच रक्कम पो.नि. मांजरे साहेब यांनी दिलीप वंजारे यांचेकडुन पंचासमक्ष जप्त केली. केलेल्या कारवाईचा सविस्तर पंचनामा केला. तरी मला माझ्या पत्नीचे निलंबन थांबविण्याकरीता व मला निलंबन कालावधीमध्ये जवळचे मुख्यालय देण्याकरीता साहेबाना सांगुन तुमचे काम करून देतो असा प्रभाव पाडुन श्री.दिलीप वंजारे यांनी दिनांक 08/07/2024 रोजी पडताळणी कारवाई दरम्यान 1,00,000/- रू.लाचेची मागणी करून 25,000/-रू विभागीय कृशी सहसंचालक, अमरावती विभाग, अमरावती कार्यालयाचे परीसरात अंदाजे 17.57 वा. ते 18.15 वा.च्या दरम्यान स्विकारली वरून माझी त्यांचे विरूध्द माझी कायदेशीर फिर्याद आहे. माझी वरिल प्रमाणे फिर्याद लॅपटॉपवर टाईप केली असुन त्याची प्रिंट काढूण ती मला वाचायला दिली, माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी टाईप केली आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
tulsiram manikrao dhakulkar
**Rank** (पद): SI (Sub-Inspector) **No.**(क्र.): 16101000571TM
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

स्टे. अमलदार
पो.स्टे. गाडगे नगर
अमरावती शहर

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Prashant Ramchand
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** 69068